आस्थापना - कोकण विभाग

अकृषिक कामासाठीची ८४ पदे,अपर तहसिलदार शेतजमीन न्यायाधिकरण यांची ५९ पदे अशा आकृतीबंधाबाहेरील एकूण १४३ अस्थायी पदांना दिनांक ०१/०३/२०२४ ते दिनांक ३१/०८/२०२४ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः इएसटी-२०२४/प्र.क्र.३२/ई-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: १५ मार्च,२०२४.

संदर्भ :-

१) महसूल व वन विभाग,शासन निर्णय, क्रमांक : संकिर्ण-१००२/प्र.क्र.६६(भाग-२)/ ई-८, दि.२०/०३/२००६.

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. ईएसटी-२६०६/प्र.क्र.२०६/ई-८,दि.१३/१२/२०१०

३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. ईएसटी-२०१७/प्र.क्र.३३/ई-८, दि.२१/०४/२०१७.

४) महसूल व वन विभाग,शासन निर्णय, क्र. ईएसटी-२०१९/प्र.क्र.३३/ई-८,दि.०४/०४/२०१९ व दि.२२/१०/२०१९

५) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.३१/०८/२०२३ व शासन शुध्दिपत्रक, दि.०६/०९/२०२३.

६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय,क्रमांक : ईएसटी-२०२२/प्र.क्र.५२/ई-८,दि.२०/०९/२०२३

७) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.२१/०२/२०२४

प्रस्तावना :-

वित्त विभागाच्या दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयास अनुसरुन कोकण विभागातील अकृषिक कामासाठीची ८४ पदे, अपर तहसिलदार शेतजमीन न्यायाधिकरण यांची ५९ पदे अशा आकृतीबंधाबाहेरील एकूण १४३ अस्थायी पदांना दिनांक ०१/०९/२०२३ ते दिनांक २९/०२/२०२४ या कालावधीसाठी महसूल व वन विभागाच्या संदर्भाधिन दिनांक २०/०९/२०२३ च्या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली होती.

२. वित्त विभाग,शासन निर्णय,दिनांक २१/०२/२०२४ अन्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१ मार्च,२०२४ ते दिनांक ३१ऑगस्ट,२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन अकृषिक कामासाठीची ८४ पदे, अपर तहसिलदार शेतजमीन न्यायाधिकरण यांची ५९ पदे अशा आकृतीबंधाबाहेरील एकूण १४३ अस्थायी पदांना दिनांक ०१ मार्च,२०२४ ते दिनांक ३१ ऑगस्ट,२०२४ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कोकण विभागातील अकृषिक कामासाठीची ८४ पदे, अपर तहसिलदार शेतजमीन न्यायाधिकरण यांची ५९ पदे अशा आकृतीबंधाबाहेरील एकूण १४३ अस्थायी पदांना संदर्भाधीन क्र.०३ येथील शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील अस्थायी पदांना दिनांक ०१ मार्च,२०२४ ते दिनांक ३१ ऑगस्ट,२०२४ या कालावधीसाठी वित्त विभाग,शासन निर्णय, दिनांक २१/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अस्थायी पदांवर होणारा खर्च "मागणी क्र. सी-१,२०५३- जिल्हा प्रशासन,(०९३)जिल्हा आस्थापना,(०१) सर्वसाधारण आस्थापना,(०१)(०१),आयुक्त कोकण,(२०५३००२८)०१,वेतन" या लेखाशीर्षा - खालील सन २०२४-२०२५ साठी मंजूर झालेल्या अर्थसंकल्पिय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक २१/०२/२०२४ च्या शासन निर्णयात दरम्यानच्या काळात सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे तसेच यानंतर सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्याकरीता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही, याची सर्व प्रशासकीय विभागांनी नोंद घेण्याबाबत वित्त विभागाने निर्देशित केले आहे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दिनांक २१/०२/२०२४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०३१९१६१२५२४०१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

SHRIRAM DATTATRAYA YADAV

Digitally signed by SHRIRAM DATTATRAYA YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=9da0e03bd84c1e17d78ad320814d003150fbf7d2abd36f924e5705145bf0e270, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=50CB0CE4CC4FE54C74F42B860354E86EC00B3B36F5F215C9F7658E611006A200, cn=SHRIRAM DATTATRAYA YADAV
Date: 2024.03.19 16:22:08 +05'30'

(श्रीराम यादव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर/ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/पालघर.
३) प्रधान महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा) -१,महाराष्ट्र, मुंबई.
४)अपर तहसिलदार,अंधेरी/कुर्ला-१/कुर्ला-३/बोरीवली-१/बोरीवली-२/ ठाणे/ कल्याण/ भिवंडी/ वसई / पालघर/जव्हार/रत्नागीरी (संबंधित जिल्हाधिका-यांमार्फत)
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
७) अपर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/ पालघर/रायगड/रत्नागीरी व सिंधुदुर्ग.
९) कार्यासन अधिकारी, (आ.पु.क./ व्यय-९), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
१०) कार्यासन अधिकारी, (कार्यासन ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) निवड नस्ती, (कार्यासन ई-८), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.